**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यभरात ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचा उत्साह, सर्व विद्यापीठांमध्ये योगाभ्यास सुरू करण्याचा राज्यपालांचा विचार

- माझी वसुंधरा अभियानाचा सहावा टप्पा राज्यात राबवला जाणार

- ज्ञानेश्वर माऊली आणि तुकाराम महाराजांच्या पालख्यांचा आज पुण्यात मुक्काम

**आणि**

- यशस्वी जयस्वाल, शुभमन गिल आणि ऋषभ पंतच्या शतकाच्या जोरावर इंग्लंड विरुद्धच्या पहिल्या कसोटीत भारताच्या पहिल्या डावात ४७१ धावा

**<><><><><>**

११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन राज्यभरात मोठ्या उत्साहात आणि विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. योगदिनानिमित्त मुंबईत राजभवन इथं आयोजित योगसत्रात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी सहभाग घेतला. सर्व विद्यापीठांमध्ये योगाभ्यास सुरू करण्याबाबत कुलगुरूंशी चर्चा करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वारकरी भक्तीयोग कार्यक्रमात वारकऱ्यांसोबत योग साधना केली. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले.

**- - होल्ड- मुख्यमंत्री-**

राज्यभरातल्या योग दिन सोहळ्याशिवाय जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

***होल्ड व्हाइस कास्ट***

*(मुंबईजवळ कान्हेरी लेणी इथं आयोजित योग कार्यक्रमात केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल सहभागी झाले. मुंबईतल्या घारापुरी लेणी, बुलडाण्यातलं गायमुख मंदिर, पुण्यातला आगा खान पॅलेस आणि शिवनेरी किल्ला, छत्रपती संभाजीनगरमध्ये बिबी का मकबरा, अमरावतीत बौद्ध स्तूप, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अजिंठा लेणी इथंही योग प्रात्यक्षिक झाले.*

*सांगली जिल्ह्यातही भक्तियोग या कार्यक्रमाचं आयोजन झालं होतं. यात विक्रमी संख्येनं ५ लाखांपेक्षा जास्त नागरिकांनी सहभाग नोंदवत विश्वविक्रम रचला. वारकऱ्यांनीही ताल धरत योगासनं केली.*

*भुसावळमध्ये झालेल्या कार्यक्रमात १० हजार जणांनी योगसाधना केली. बीडमध्ये सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयाने 'योग दिंडी आपल्या दारी' या अभियानाची सुरुवात केली. या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना नियमित योगाभ्यासासाठी प्रेरित केलं गेलं.*

*आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या देशव्यापी सोहळ्याचा भाग म्हणून, राष्ट्रीय छात्र सेनेच्या महाराष्ट्र संचालनालयाने आज राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये सामूहिक योग सत्रांचं आयोजन केले. या कार्यक्रमामध्ये ५० हजारापेक्षा जास्त छात्र सैनिक, अधिकारी, सहाय्यक छात्र सेना अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उत्साहाने सहभागी झाले होते.*

*सोलापुरात माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्युरो तसंच जिल्हा आणि पोलीस प्रशासनानं संयुक्त योग कार्यक्रमाचं आयोजन केलं. यात हजारो नागरिकांनी सहभाग घेतला. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी योग या भारताच्या समृद्ध परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्याचं आवाहन केलं.*

*धाराशिवमध्ये जिल्हा प्रशासन आणि विविध संस्थांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या योगसत्रात ५०० पेक्षा जास्त योगप्रेमी, विशेषतः युवा वर्गाचा लक्षणीय सहभाग लाभला.*

*धुळ्यात पोलीस कवायत मैदानावर झालेल्या विशेष योग सत्रात, प्रशिक्षित योग शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ओंकार, प्रार्थना आणि विविध योगासनांचा सराव करण्यात आला. शासकीय कार्यक्रमासोबतच विविध सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था आणि मॉर्निंग वॉक ग्रुप्सनीही कार्यक्रमांचं आयोजन केलं.*

*योगाभ्यासामुळे मानवाचा शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक संगम साधण्यास मदत होते, त्यामुळे दैनंदिन जीवनात योगाभ्यासाचा अवलंब करायचं आवाहन चंद्रपुरात झालेल्या कार्यक्रमात राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी केलं.*

*भारताने जगाला दिलेलं योग साधनेचं ज्ञान प्रत्येकाच्या जगण्यात झिरपावं अशी अपेक्षा रायगडमध्ये महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी व्यक्त केली.*

*अकोल्यात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ परिसरात झालेल्या कार्यक्रमातही शेकडो नागरिकांनी योगासनाचा सराव केला.*

*बुलडाण्यात झालेल्या विशेष योग कार्यक्रमात सुमारे अडीच हजार योगप्रेमींनी सहभाग नोंदवून निरोगी जीवनशैलीचा संदेश दिला.*

*पोलीस अधिकारी आणि अंमलदारांनी निरोगी आणि तणावमुक्त आयुष्यासाठी दररोज २० ते ३० मिनिटं योगासनांसाठी समर्पित करण्याचं आवाहन रत्नागिरीत कोकण परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी केलं. सिंधुदुर्ग जिल्ह्यात वेंगुर्ले येथील नगर परिषदेच्या सिंधुसागर जलतरण तलावामध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी जलतरण करत विविध योग प्रकार सादर करत निरोगी जीवनासाठी योगाचे महत्व असल्याच पटवून दिल.)*

**<><><><><>**

जागतिक संगीत दिनानिमित्त आज मुंबईत महाराष्ट्र रेडिओ महोत्सव आणि आशा रेडिओ पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विविध रेडिओ वाहीन्यांच्या रेडिओ जॉकींनी मुलाखत घेतली. रेडिओ हे देशाच्या कानाकोपऱ्या पर्यंत पोहोचणारं सशक्त माध्यम असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ गायिका आशा भोसले, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, आणि इतर मान्यवर उपस्थित होते. रेडिओ नसता, तर मी नसते, अशा शब्दांत आशा भोसले यांनी रेडिओ बद्दलच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमात एकूण १२ रेडिओ पुरस्कार देण्यात आले. आशा सर्वोत्कृष्ट कम्युनिटी रेडिओ केंद्राचा पुरस्कार विकास भारती रेडिओ केंद्र नंदूरबार यांना प्रदान करण्यात आला.

**<><><><><>**

राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ‘माझी वसुंधरा अभियान सहावा टप्पा’ राबवण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली आहे. या अभियानाअंतर्गत नोंदणी केलेल्या ४२२ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि २७ हजार ८९५ ग्रामपंचायती अशा एकूण २८ हजार ३१७ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत हे अभियान राबवलं जाणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या अकरा वर्षात देशाच्या सर्वांगीण विकासाची पायाभरणी केली आहे, असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. नागपुरात ते बोलत होते. या कालावधीत सरकारने गरीब, कामगार, शेतकरी यांचं जीवन समृद्ध करण्यासाठी धोरणं आखल्याचं गडकरी म्हणाले.

**<><><><><>**

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या संत श्री ज्ञानेश्वर महाराज आणि संत श्री तुकाराम महाराजांच्या पालख्यांचा आज पुण्यात मुक्काम असल्यानं शहरातील वातावरण भक्तिमय झालं आहे. मुक्कामाच्या ठिकाणी भाविकांनी पहाटेपासूनच दर्शनासाठी रांगा लावल्या आहेत. उद्या पहाटे दोन्ही पालख्या हडपसरमार्गे आपल्या पुढील मुक्कामासाठी मार्गस्थ होणार आहेत.

शेगाव इथून निघालेली संत गजानन महाराजांची पालखी आज बीड जिल्ह्यात अंबाजोगाई मध्ये आगमन पोहोचली. यावेळी पालखीचं दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

**<><><><><>**

पिंपरी-चिंचवड महापालिका सुधारित विकास आराखड्यामध्ये प्रस्तावित केलेला मोशी आणि तीर्थक्षेत्र आळंदीच्या परिसरातलं कत्तलखान्याचं आरक्षण रद्द

करण्यात येईल अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात केली. ग्रामस्थांनी अलिकडेच मुख्यमंत्र्यांना याबाबत निवेदन दिलं होतं.

<><><><><>

नाट्य आणि चित्रपट अभिनेता तुषार घाडीगावकर यानं आत्महत्या केली आहे. 'चला हवा येऊ द्या' मालिकेत अभिनय करत असलेल्या अंकुर वाढवे यानं इन्स्टाग्राम या समाजमाध्यमावर पोस्ट करत या घटनेची माहिती दिली. काम मिळत नसल्याने तुषारनं हे पाऊल उचलल्याचं प्राथमिक माहितीतून समोर आल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. तुषार घाडीगांवकर ने लवंगी मिर्ची, मन कस्तूरी रे, बाहुबली, उनाड, झोम्बीवली, हे मन बावरे, संगीत बिबट आख्यान यासारख्या मराठी, हिंदी चित्रपट तसंच मालिकांमध्ये अभिनय केला आहे.

<><><><><>

बीड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यांमधल्या विविध गुन्ह्यांमध्ये फरार असणारा कुख्यात गुन्हेगार अतुल विक्रम वाघमारे याला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं ही कारवाई केली. त्याच्या ताब्यातुन पाच दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. अतुल वाघमारे याच्यावर दरोडे तसंच इतर बरेच गुन्हे दाखल असल्याची माहिती आमच्या बातमीदारानं दिली आहे.

<><><><><>

धुळे जिल्ह्यात शिरपूर इथं बालमजुरी विरोधी विशेष पथकानं काल एका उपाहारगृहावर छापा टाकून दोन बाल कामगारांची सुटका केली. या अल्पवयीन मुलांना साक्री रोड इथल्या बालकल्याण समितीकडे सोपवण्यात आलं असून, विशेष पथकानं या प्रकरणी एका व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

<><><><><>

इंग्लंडमधल्या हेडींग्ले इथं भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरु असलेल्या तेंडुलकर-अँडरसन चषक पाच सामन्यांच्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या

कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारताचा पहिला डाव ४७१ धावांवर संपला. त्याआधी कालच्या ३ बाद ३५९ धावसंख्येवरुन आज भारताच्या डावाला सुरुवात झाली. कालच्या शतकवीर यशस्वी जयस्वाल आणि शुभमन गिल पाठोपाठ आज ऋषभ पंतनंही आपलं शतक झळकावलं. मात्र, निवडक फलंदाजांच्या चांगल्या खेळी वगळता भारताच्या इतर फलंदाजांनी निराशा केल्यानं एकावेळी ४ बाद ४३० असा सुस्थितीत असणारा भारताचा डाव ४७१ धावांत आटोपला. इंग्लंडच्या बेन स्टोक्सनं ६६ धावांत ४ तर जोश टंगनं ८६ धावांत भारताचे ४ गडी बाद केले. पावसामुळं इंग्लंडचा डाव अजून सुरू झालेला नाही.

**<><><><><>**

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात विविध अभियांत्रिकी आणि देखभालीची कामं करण्यासाठी उद्या मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. यामुळे लोकल सेवा विलंबाने धावेल. मध्य मार्गावर माटुंगा ते मुलुंड आणि हार्बर मार्गावर मानखुर्द ते नेरुळ दरम्यान मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. माटुंगा ते मुलुंड अप आणि डाउन धिम्या मार्गावर सकाळी ११ वाजून ५ मिनिटांपासून ते दुपारी ३ वाजून ५५ मिनिटांपर्यंत मेगाब्लॉक असेल तर हार्बर मार्गासाठी मानखुर्द आणि नेरुळ दरम्यान अप आणि डाउन मार्गावर सकाळी ११ वाजून १५ मिनिटांपासून ते दुपारी ४ वाजून १५ मिनिटांपर्यंत मेगा ब्लॉक असेल.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी तर मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल. कोकणात आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी अती जोरात पावसाची शक्यता असून, कोकण किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहतील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**